# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
गणेशखिंड, पुणे - ४११००७
# Savitribai Phule Pune University
Ganeshkhind, Pune - 411007

दूरध्वनी क्रमांक : ०२०– २५६२११५६/५७/७९
Telephone : 020-25621156/57/79
ईमेल/ Email : boards@pun.unipune.ac.in

शैक्षणिक विभाग (मान्यता कक्ष)
Academic Section (Approval Cell)
वेबसाइट/ Website: www.unipune.ac.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## परिपत्रक क्र. १२६ /२०२५

**विषय :–** विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेतील अभियांत्रिकी पदव्युत्तर पदवीचा आराखडा व अभ्यासक्रम सुधारित करण्यासाठी कार्यशाळा आयोजनास व त्यासाठी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देण्याबाबत

विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेतील अभियांत्रिकी पदव्युत्तर पदवीच्या प्रथम वर्षाचा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२५–२६ पासून सुधारित करावयाचा आहे.

अभियांत्रिकी पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम राबविणाऱ्या महाविद्यालयांच्या प्राचार्यांना कळविण्यात येते की, त्यांनी त्यांच्या महाविद्यालयात पदव्युत्तर पदवी वर्गास अध्यापन करणाऱ्या संबंधित अध्यापकांना उक्त कार्यशाळेस उपस्थित राहण्यासाठी प्राधान्याने कार्यमुक्त करावे व कार्यशाळेच्या दिवसांची कर्तव्यरजा संबंधित अध्यापकांना मंजूर करावी.

विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेतील अभियांत्रिकी पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसंबंधीची अभ्यासमंडळे/तदर्थ अभ्यासमंडळांच्या अध्यक्षांना विनंती करण्यात येते की, प्रथम वर्ष पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुधारित करण्यासाठी त्यांच्या अभ्यास मंडळाशी संबंधित अध्यापकांची १ दिवसीय कार्यशाळा त्यांच्या महाविद्यालयात/विद्यापीठ विभागात आयोजित करावी. सदर कार्यशाळेच्या खर्चासाठी कमाल रू. १५,०००/– पर्यंतच्या खर्चाची प्रतिपूर्ती विद्यापीठाकडून करण्यात येईल.

या अनुषंगाने कळविण्यात येते की, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेतील अभियांत्रिकी पदव्युत्तर पदवी संबंधित अध्यापकांची कार्यशाळा त्या–त्या नियमित अभ्यास मंडळावर अध्यक्ष म्हणून निवडून आलेल्या व अभियांत्रिकी पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासंबंधीच्या तदर्थ अभ्यास मंडळावर मा. कुलगुरू यांनी नामनिर्देशित केलेले

अध्यक्ष ज्या संलग्न महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्थांमध्ये कार्यरत आहेत तेथे १ दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

गणेशखिंड, पुणे — ४११००७ )
जावक क्र. सीबी/ ४४१/२८९ )
दिनांक : ०८ / ०५ / २०२५)

8/5/2025
(स. द. डावखर)
उपकुलसचिव

प्रत माहितीसाठी :—

१. मा. कुलगुरु कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ
२. मा. प्र—कुलगुरु कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ
३. मा. कुलसचिव कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ,

प्रत माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी:—

१. मा. अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा, प्रस्तुत विद्यापीठ
२. मा. वित व लेखा अधिकारी, प्रस्तुत विद्यापीठ
३. मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, प्रस्तुत विद्यापीठ
४. मा. प्राचार्य/संचालक, सर्व संबंधित संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था
५. मा. उपकुलसचिव, शैक्षणिक पात्रता विभाग, प्रस्तुत विद्यापीठ
६. मा. उपकुलसचिव, शैक्षणिक प्रवेश विभाग, प्रस्तुत विद्यापीठ
७. मा. उपकुलसचिव, शैक्षणिक संलग्नता विभाग, प्रस्तुत विद्यापीठ
८. मा. अध्यक्ष/अध्यापक, अभियांत्रिकी विद्याशाखेतील सर्व नियमित/तदर्थ अभ्यासमंडळे